# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि.११ ऑगस्ट,२०२०

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने जळगाव,धुळे व नंदूरबार जिल्हयातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षक तसेच विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी 'कोविड-१९ काळात विद्यार्थ्यांना शिकविण्याचे माझे अभिनव प्रयोग' या विषयावर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

कोरोना विषाणूमुळे शैक्षणिक संस्था बंद असल्याने ऑनलाईन वर्ग घेऊन काही वेगळे प्रयोग करून शाळा व महाविद्यालयांमधील शिक्षक शिकवीत आहेत. या अभिनव प्रयोगाची माहिती फोटो/व्हिडीओ प्रेझेंटेशन असलेला व्हिडीओ (जास्तीत जास्त २०० सेकंद लांबीचा) तयार करून या स्पर्धेसाठी शिक्षक व प्राध्यापकांनी २९ ऑगस्ट रोजी सांयकाळी ५ वाजेपर्यंत directorlllb@nmu.ac.in या ई-मेलवर पाठवावेत. प्राप्त व्हिडीओची तज्ज्ञांकडून छाननी केली जाईल. प्राध्यापक आणि शिक्षकांना स्वतंत्र असे प्रथम क्रमांकासाठी रूपये ३०००/- द्वितीय रूपये २०००/- आणि तृतीय क्रमांकासाठी १०००/- रूपयांचे बक्षीस व प्रमाणपत्र जाहीर ऑनलाईन कार्यक्रमात देण्यात येणार आहे. तरी या स्पर्धेत शिक्षक व प्राध्यापकांनी अधिक संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन या विभागाचे प्रभारी संचालक प्रा.मनिष जोशी यांनी केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

जळगाव

महोदय,

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसध्दि करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी